सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ३ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव – बयाबाई बाळकृष्ण खोब्रागडे,
वय – ६१ वर्ष, व्यवसाय – शेतमजुरी,
राहणार – खात, ता. मौदा ,जिल्हा – नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा**

मी आरोपीला ओळखते. तसेच मी फिर्यादी गीताबाईला सुध्दा ओळखते. घटना अंदाजे चार ते पाच वर्षापुर्वी सकाळी ७.०० ते ७.३० च्या दरम्यान आमचे घराजवळील सरकारी नळाजवळ घडली होती. त्यावेळी मी व इतर काही बायका नळावर पाणी भरत होतो. त्यावेळेस फिर्यादी पाणी भरत होती. तिचा पाण्याचा गुंड भरत आला होता. तेवढयात आरोपी तेथे आला व फिर्यादीला म्हणाला की, त्याला पाणी भरायचे आहे. परंतु फिर्यादीने आरोपीला पाणी भरु दिले नाही त्यामुळे आरोपी चिडला व त्याने पाण्याचा हंडा फिर्यादीच्या डोक्यावर मारला त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटुन रक्त निघाले. फिर्यादीची सासु सुध्दा त्यावेळी तेथेच हजर होती. फिर्यादीच्या सासुने फिर्यादीला सरकारी दवाखान्यात नेले. घटनेबाबत पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. ज्या हंडयाने आरोपीने फिर्यादीला मारहाण केली होती तो हंडा मला दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला जप्त मुद्देमाल स्टीलचा हंडा आर्टिकल 'अ' दाखविला. याच हंडयाने आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर मारहाण केली होती. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीचे ॲड. ए. एस. रेवतकर यांच्यातर्फे –**

हे म्हणणे खरे आहे की गावातील सार्वजनिक नळाच्या आजुबाजुला घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की आरोपी पुर्वीपासुन माझ्या मोहोल्यात राहतो. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीसोबत माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की माझे आरोपी व

त्याच्या घरच्यांसोबत बोलचाल बंद आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या गावातील सरपंच डहाके आहेत. हे म्हणणे खरे आहे की आरोपीच्या जावई रविन्द्र भुतांगे याचेविरुध्द मी सरपंचाकडे दारु विक्री करतो या संबधी तक्रार केली होती. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, गावातील इतर लोकांनी सुध्दा त्या तक्रारीवर सहया केल्या होत्या. आरोपीच्या वडीलांवर पोलीसांनी कारवाई केल्याबाबत मला माहीती नाही. आरोपीच्या वडीलांची अवैधरित्या दारु विक्रीच्या प्रकरणातुन सुटका झाल्याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीचा जावई आरोपीच्याच घरी राहत होता. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपीला लहानपणापासुन ओळखते. हे म्हणणे खरे आहे की आरोपीला फीट येत होती. हे म्हणणे खरे आहे की आरोपी कधी कधी वेडयासारखा व कधी शहाण्यासारखा वागतो. आरोपीचे मनोरुग्ण चिकित्सकाकडे उपचार चालु असल्याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की आर्टिकल 'अ' सारखा हंडा प्रत्येकाच्या घरी असतो. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसी समझौता झाल्याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी सार्वजनिक नळाच्या ठिकाणी घसरुन पडल्यामुळे तिला डोक्याला दुखापत झाली. हे म्हणणे खरे आहे की गावातील सार्वजनिक नळाच्या बाजुला वनिता चचाणे, मंदा समरित व इतर लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझे आरोपी व आरोपीच्या घरच्यांसोबत बोलणे बंद असल्यामुळे मी आज रोजी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासात आरोपीविरुध्द चुकीचे कथन केले आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष

मौदा.

दिनांक ०१.१२.२०२२ (रा.र.शेरेकर)

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा